19 FEB 2022
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसंत पाटणकर यांचे समकालीन समीक्षकांत महत्त्वाचे स्थान

## डॉ. गणेश देवी; डॉ. म.सु. पाटील पुरस्काराचे विद्यापीठात वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सैद्धांतिक व वैचारिक मांडणीचा परामर्ष घेता समकालीन समीक्षकांमध्ये डॉ.वसंत पाटणकर यांचे स्थान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ.गणेश देवी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभागातर्फे राजर्षी शाहू सभागृहात 'डॉ. म.सु. पाटील समीक्षा पुरस्कार २०२२' मुंबई येथील ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक डॉ.वसंत पाटणकर यांना प्रदान केला. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. याप्रसंगी ज्येष्ठसाहित्यिक डॉ. पाटणकर, रंगनाथ पठारे, ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांची भाषणे झाली. याप्रसंगी प्रतिभा कणेकर यांच्या 'कवयित्रींची सर्जनशीलता' व म.सु.पाटील यांच्या 'साहित्यसमीक्षा - सिद्धांत आणि व्यवहार' या समीक्षाग्रंथांचे प्रकाशन झाले. डॉ. किरण गुरव, सोनाली नवांगुळ, डॉ. अक्षय सरवदे यांचा अनुक्रमे साहित्य अकादमी व नरहरी कुरूंदकर पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी डॉ.पाटणकर यांना दिलेल्या मानपत्राचे वाचन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी एकनाथ पगारे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, डॉ. म.सु. पाटील यांचे कुटुंबीय यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, संशोधक उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. वसंत पाटणकर यांना म.सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान करताना डॉ. गणेश देवी, कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. डॉ. रणधीर शिंदे, कवयित्री नीरजा, डॉ. राजन गवस, सौ. सरोज पाटणकर, रंगनाथ पाठारे, डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.**

19 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाटणकरांची मांडणी सैद्धांतिक

## डॉ. गणेश देवी; डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार डॉ. पाटणकर यांना प्रदान

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. वसंत पाटणकर यांना म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान करताना डॉ. गणेश देवी व कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. सोबत (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, कवयित्री नीरजा, डॉ. राजन गवस, सौ. सरोज पाटणकर, रंगनाथ पाठारे, डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.

कोल्हापूर, ता. १८ : सैद्धांतिक व वैचारिक मांडणीचा परामर्ष घेता समकालीन समीक्षकांमध्ये डॉ. वसंत पाटणकर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गणेश देवी यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभातर्फे 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार २०२२' मुंबई येथील ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक डॉ. वसंत पाटणकर यांना प्रदान केला. त्या वेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. देवी म्हणाले, ''कवितेचे कवीपण नेमके कशात आहे, याचा शोध डॉ. पाटणकर सातत्याने घेत आले. डॉ. म. सु. पाटील यांच्या नावाच्या पुरस्काराने त्यांच्या या गुण विशेषावर विद्यापीठीय शिक्कामोर्तब झाले आहे. विचारांच्या बांधणीचे एकत्रिकरण करण्याची अद्‌भुत कला डॉ. पाटील यांना अवगत होती, याचेही स्मरण यानिमित्ताने केले पाहिजे. माझी चांगल्या अर्थाने घरवापसी घडून आली. या विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराने घडलो. घडण्याची प्रेरणा या सभागृहानेच दिली. यामुळेच अमेरिका, इंग्लंड येथील विद्यापीठांमध्ये शिकवू शकलो.''

डॉ. पाटणकर म्हणाले, ''शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला प्राप्त होत असलेल्या पुरस्काराचा खूप आनंद होत आहे. डॉ. म. सु. पाटील यांच्याशी माझे जवळचे संबंध होते. शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूरकारांकडून मला नेहमीच सन्मान लाभलेला आहे. मुख्यतः काव्यसमीक्षा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू राहिलेली आहे. कविता आणि समीक्षा माणसाची आत्मिक 'भूक भागवत असते. समीक्षा करताना पळवाट स्वीकारता कामा नये. लेखन करणे ही स्वतःला एकाप्रकारे मुक्त करण्याची प्रक्रिया आहे. दीर्घकाळ साचून राहिलेले, निचरा न झालेले, बांधून टाकणारे, बंदिस्त असणारे या ठिकाणी मोकळे होते, प्रवाही होते.''

ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार रंगनाथ पठारे आणि ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे व लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांच्या शुभेच्छा संदेशाच्या चित्रफिती दाखविल्या.

याप्रसंगी प्रतिभा कणेकर यांच्या 'कवयित्रींची सर्जनशीलता' आणि म. सु. पाटील यांच्या 'साहित्यसमीक्षा - सिद्धांत आणि व्यवहार' समीक्षा ग्रंथांचे प्रकाशन झाले.

एकनाथ पगारे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, डॉ. म.सु. पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### यांचा विशेष सत्कार

डॉ. किरण गुरव, सोनाली नवांगुळ, डॉ. अक्षय सरवदे यांचा अनुक्रमे साहित्य अकादमी व नरहरी कुरूंदकर पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल डॉ. देवी यांच्या हस्ते विशेष सत्कार केला.

जनसंपर्क कक्ष
19 FEB 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समकालीन समीक्षकांत वसंत पाटणकर यांचे स्थान महत्त्वाचे

## गणेश देवी : विद्यापीठात म. सु. पाटील पुरस्काराचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सैद्धांतिक, वैचारिक मांडणीचा परामर्ष घेता समकालीन समीक्षकांमध्ये डॉ. वसंत पाटणकर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. कवितेचे कवीपण नेमके कशामध्ये आहे, याचा शोध ते सातत्याने घेत आले आहेत. डॉ. म. सु. पाटील यांच्या नावाच्या पुरस्काराने त्यांच्या या गुणविशेषावर विद्यापीठीय शिक्कामोर्तब झाले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गणेश देवी यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे राजर्षी शाहू सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबई येथील ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक डॉ. वसंत पाटणकर यांना डॉ. देवी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला. शाल, श्रीफळ, ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. विचारांच्या बांधणीचे एकत्रीकरण करण्याची अद्भुत कला डॉ. पाटील यांना अवगत होती, याचेही स्मरण यानिमित्ताने केले पाहिजे, असे डॉ. देवी यांनी सांगितले. शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला प्राप्त होत असलेल्या पुरस्काराचा खूप आनंद होत आहे. डॉ. म. सु. पाटील यांच्याशी माझे जवळचे संबंध होते.




शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी डॉ. वसंत पाटणकर यांना म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार डॉ. गणेश देवी व कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदान केला. यावेळी डावीकडून रणधीर शिंदे, कवयित्री नीरजा, राजन गवस, सरोज पाटणकर, रंगनाथ पठारे, व्ही. एन. शिंदे, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

विद्यापीठ आणि कोल्हापूरकरांकडून मला नेहमीच सन्मान लाभलेला आहे. काव्यसमीक्षा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू राहिलेली आहे. कविता आणि समीक्षा माणसाची आत्मिक भूक भागवत असते, असे डॉ. पाटणकर यांनी सांगितले.

ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे, ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांनी मनोगत व्यक्त केले. प्रतिभा कणेकर यांच्या 'कवयित्रींची सर्जनशीलता' आणि म. सु. पाटील यांच्या 'साहित्यसमीक्षा- सिद्धांत आणि व्यवहार' या समीक्षाग्रंथांचे प्रकाशन झाले. डॉ. किरण गुरव, सोनाली नवांगुळ, अक्षय सरवदे यांचा सत्कार केला. यावेळी एकनाथ पगारे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, सरोज पाटणकर, डॉ. पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे प्रास्ताविक केले.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी मानपत्र वाचन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### माझी घरवापसी

या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहता येत असल्याचा आनंद आहे. माझी चांगल्या अर्थाने घरवापसी घडून आली. या विद्यापीठात मिळालेल्या प्रेरणेमुळेच अमेरिका, इंग्लंड येथील विद्यापीठांमध्ये शिकवू शकलो, असे डॉ. देवी यांनी सांगितले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे आज शिवजयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि.१९) शिवाजी विद्यापीठातर्फे इतिहास संशोधक डॉ. सुरेश शिखरे यांचे विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज यांची आरमार नीती' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यू ट्यूब वाहिनीवरून या व्याख्यानाचे प्रसारण होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. तत्पूर्वी, सकाळी ८.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन असा कार्यक्रम होणार आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठास अडीच कोटींचा निधी

## सामंतांकडून डॉ. सोनकवडेंचे कौतुक



डॉ. सोनकवडे

कोल्हापूर, ता. १८ : विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे सिनरजेटीक ट्रेनिंग प्रोग्राम योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठास २ कोटी ५२ लाखांचा निधी मिळाला. त्याबद्दल उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठ प्रशासनासह डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे कौतुक केले. त्याबाबतचे पत्र त्यांनी विद्यापीठास पाठविले आहे. डॉ. सोनकवडे भौतिकशास्त्र विभागात कार्यरत आहेत. ते प्रकल्प प्रमुख असून सामंत यांनी पत्राद्वारे त्यांचेही अभिनंदन केले आहे. डॉ. सोनकवडे यांच्या नावे 'मायक्रोवेव्ह इंड्यूस्ड केमिकल इनिंग ऑफ एल आर-११५ टाईप सेकंड सॉलीड स्टेट न्युक्लिअर डिटेक्टर' संशोधनासाठी गतवर्षी पेटंट घोषित झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे अप्लाइड फिजिक्सचे विभाग प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.



पुढारी

# विद्यापीठ आंतरविभागीय रग्बी स्पर्धेत न्यू कॉलेजला विजेतपद



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय रग्बी स्पर्धेत विजेतपद पटकाविणारा न्यू कॉलेजच्या मुलींचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भोगावती महाविद्यालय, कुरुकली तर्फे शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय रग्बी मुलीच्या स्पर्धेत न्यू कॉलेजने अजिंक्यपद पटकाविले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यू कॉलेज संघाने एल.बी. एस. कॉलेज सातारा संघावर २२ विरुद्ध ७ गुणाने मात केली.

स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात न्यू कॉलेजने यशवंत पाटील कॉलेज सोळांकूर संघावर १८ विरुद्ध ०५ गुणाने मात करत अंतिम फेरीत धडक दिली. विजयी संघात शुभांगी गावडे, सोनाली साळवी, शीतल शिनगारे, कल्याणी पाटील, वृषाली वरक, ऋतुजा कळंत्रे, पायल कनोजिया, श्रुती धोत्रे, पोर्णिमा साळे, वैष्णवी चौगले, सिध्दी चौगले, तेजस्विनी खाडे यांचा समावेश आहे.

सर्वांना प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, क्रीडा प्रमुख अमर सासने, प्रशिक्षक दीपक पाटील, प्रा. डी. डी. भोपळे आदींचे मार्गदर्शन लाभले.